(१)

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संदर्भ क्र. : शिवाजी वि./पीजी प्रवेश/पारितोषिक/केएसएस/८८२/ दि.२९/०४/२००८

प्रति,

१. **प्राचार्य,**
सर्व संलग्न महाविद्यालये,

२. **संचालक,**
सर्व मान्यताप्राप्त शिक्षण संस्था

३. **सर्व पदव्युत्तर अधिविभागप्रमुख**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय : "कै. श्रीमती सीताबाई कुलकर्णी संशोधन पारितोषिक बाबत.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यांत येते की, या कार्यालयाच्या जाक. शिवाजी वि./पीजी प्रवेश/पारितोषिक/२०७-२०८/डीआरपीएल/०१/दि.०५.०४.२००६ नुसार नियमावली परिपत्रक कळविण्यांत आले होते. तथापि त्यातील नियम क्र. २ मध्ये विद्यापीठ अधिकार मंडळाने केलेल्या ठरावानुसार खालील प्रमाणे बदल करण्यांत आलेला आहे.

प्रचलित नियम क्र. २ :

दरवर्षी ०१ जून ते ३१ मे या कालावधीमध्ये शिवाजी विद्यापीठास इतिहास विषयासाठी पीएच.डी. पदवीसाठी सादर होणाऱ्या उत्कृष्ट प्रबंधास सदरचे पारितोषिक देण्यांत येईल.

सुधारीत नियम क्र. २ :

दरवर्षी ०१ जून ते ३१ मे या कालावधीमध्ये शिवाजी विद्यापीठास इतिहास विषयासाठी पीएच.डी. पदवीसाठी स्वीकृत किंवा मान्य होणाऱ्या उत्कृष्ट प्रबंधास सदरचे पारितोषिक देण्यांत येईल.

तरी सदरची बाब सर्व संबधितांच्या निदर्शनास आणावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

[signature]

कुलसचिव

प्रत माहितीसाठी :

१. मा. डॉ. अ. रा. कुलकर्णी, "श्री", ९९२/९९३, २३ राजेंद्रनगर, पुणे ४११ ०३०

माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी

१. पीजीबीयुटीआर विभाग २. दीक्षांत विभाग ३. पगारपत्रके विभाग ४. भांडार विभाग

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी वि./ पी जी प्रवेश/ पारितोषिक 207,209/ डीआरपीएल /01 दिनांक: 05.04.2006

प्रति,

1) प्राचार्य,
सर्व संलग्न महाविद्यालये,

2) संचालक,
सर्व मान्यताप्राप्त शिक्षण संस्था,

3) सर्व पदव्युत्तर अधिविभागप्रमुख,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषयः 1. " कै. श्रीमती सीताबाई कुलकर्णी संशोधन पारितोषिक"
2. " कै. श्रीमती सीताबाई कुलकर्णी एम्. ए. पारितोषिक" व
3. " कै. श्रीमती सीताबाई कुलकर्णी व्याख्यानमाला / चर्चासत्र / पुस्तक प्रकाशन अनुदान" या योजनांच्या निर्मितीबाबत...

महोदय/ महोदया,

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणांस आदेशानुसार कळविण्यांत येते की, डॉ. अ. रा. कुलकर्णी, सुप्रतिष्ठ प्राध्यापक, पुणे विद्यापीठ, पुणे यांनी त्यांच्या मातोश्रींच्या नांवे वरील दोन पारितोषिके व व्याख्यानमाला / चर्चासत्र / पुस्तकप्रकाशन अनुदान या योजना प्रस्तापित करण्यांसाठी विद्यापीठास देणगी दिली आहे. या देणगी रक्कमेचा स्विकार होवून विद्यापीठ अधिकार मंडळाने सदर पारितोषिकांच्या व व्याख्यानमाला / चर्चासत्र / पुस्तकप्रकाशन अनुदान या योजनांच्या निर्मितीस मान्यता दिली आहे. सदरची पारितोषिके मार्च/ एप्रिल, 2006 च्या परीक्षेपासून देण्यांत येणार आहेत. तसेच व्याख्यानमाला / चर्चासत्र / पुस्तकप्रकाशन अनुदान या योजना सन 2006. 2007 या शैक्षणिक वर्षापासून राबविण्यांत येणार आहेत. विद्यापीठ अधिकार मंडळाने सदर पारितोषिकांचे व व्याख्यानमाला / चर्चासत्र / पुस्तकप्रकाशन अनुदान या योजनांचे नियम खालील प्रमाणे मान्य केले आहेत.

" कै. श्रीमती सीताबाई कुलकर्णी संशोधन पारितोषिक " नियमावली

1. या पारितोषिकाचे नामाभिदान " कै. श्रीमती सीताबाई कुलकर्णी संशोधन पारितोषिक" असे राहील.

....2

दरवर्षी 1 जून ते 31 मे या कालावधीमध्ये शिवाजी विद्यापीठास इतिहास विषयासाठी पीएच.डी. पदवीसाठी सादर होणा–या उत्कृष्ट प्रबंधास सदरचे पारितोषिक देण्यांत येईल.

3. [redacted] ~~इतिहास अधिविभाग यांचे अध्यक्षतेखाली मा. कुलगुरू त्रिसदस्य समिती नियुक्त~~ करतील व सदर समिती पीएच.डी. पदवी जाहीर झालेल्या व ~~नामांकन अर्ज केलेल्या संशोधकांच्या शोधप्रबंधांचा अभ्यास करून त्यामधील आदर्श~~ [redacted] ~~देण्यात येईल.~~

4. या पारितोषिकाची अंमलबजावणी सन 2006.2007 या शैक्षणिक वर्षापासून करण्यांत येईल.
5. देणगी दिलेल्या रक्कमेच्या येणा–या व्याजामधून प्रशासकीय खर्च व कॉर्पस रक्कम वजा जाता उर्वरित रक्कमेमधून रू. 1,000/– चे पारितोषिक देण्यांत येईल व उर्वरित रक्कम मूळ देणगीरूप रक्कमेमध्ये जमा करण्यांत येईल.
6. देणगी रक्कमचे बाबत व पारितोषिकाबाबत सर्व अंतिम अधिकार विद्यापीठ अधिकार मंडळाकडे राहतील.
7. सदरचे पारितोषिक टपाल सेवेने देण्यात येईल.

**"कै. श्रीमती सीताबाई कुलकर्णी एम. ए. पारितोषिक"** नियमावली

1. या पारितोषिकाचे नामाभिदान "कै. श्रीमती सीताबाई कुलकर्णी एम. ए. पारितोषिक" असे राहील.
2. शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामधून एम. ए. (इतिहास) अभ्यासक्रमामध्ये गुणानुक्रमे प्रथम येणा–या विद्यार्थ्यास / विद्यार्थीनीस सदरचे पारितोषिक देण्यांत येईल.पारितोषिकासाठी दोन समान गुणाचे विद्यार्थी/ विद्यार्थीनी पात्र ठरल्यास सदरचे पारितोषिक दोन समान भागात विभागून देण्यांत येईल.
3. या पारितोषिकाची अंमलबजावणी एप्रिल/ मे, 2006 च्या परीक्षेपासून करण्यांत येईल.
4. देणगी दिलेल्या रक्कमेच्या येणा–या व्याजामधून प्रशासकीय खर्च व कॉर्पस रक्कम वजा जाता उर्वरित रक्कमेमधून रू. 1000/– चे पारितोषिक देण्यांत येईल. व्याजातील काही रक्कम शिल्लक राहील्यास ती मूळ देणगीरूप रक्कमेमध्ये जमा करण्यांत येईल.

....3

5. देणगी रक्कमेबाबत व पारितोषिकाबाबत सर्व अंतिम अधिकार विद्यापीठ अधिकार मंडळाचे राहतील.
6. सदर पारितोषिक टपाल सेवेने देण्यांत येईल.

**"कै. श्रीमती सीताबाई कुलकर्णी व्याख्यानमाला, चर्चासत्र, पुस्तक प्रकाशन अनुदान"**

नियमावली

1. अ)"कै. श्रीमती सीताबाई कुलकर्णी व्याख्यानमाला"
   ब)"कै. श्रीमती सीताबाई कुलकणी चर्चासत्र"
   क)"कै. श्रीमती सीताबाई कुलकर्णी पुस्तक प्रकाशन अनुदान"
   असे या योजनांचे नांव राहील.
2. उपरोक्त अनुक्रमांक 1 मधील अ, ब, क मधील योजना दर तीन वर्षानीं आयोजित करण्यांत येतील.
   उदाहरणार्थ –
   अ)"कै. श्रीमती सीताबाई कुलकर्णी व्याख्यानमाला" – सन 2006.2007
   ब)"कै. श्रीमती सीताबाई कुलकणी चर्चासत्र" – सन 2007.2008
   क)"कै. श्रीमती सीताबाई कुलकर्णी पुस्तक प्रकाशन अनुदान"– सन 2008.2009
3. देणगी रक्कमेच्या येणा–या व्याजातून प्रशासकीय खर्च वजा जाता रू. 1980/– मधून उपरोक्त व्याख्यानमाला, चर्चासत्र व पुस्तक प्रकाशन अनुदान या योजना राबविण्यांत येतील. व्याजातील काही रक्कम शिल्लक राहिल्यास ती मूळ देणगीरक्कमेत जमा करण्यांत येईल.
4. व्याख्यानमाला व चर्चासत्र मा. विभागप्रमुख, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या अधिकारामध्ये आयोजित करण्यांत येईल.
5. पुस्तक प्रकाशन अनुदान देण्यांसाठी मा. कुलगुरू त्रिसदस्य समिती नियुक्त करतील. सदर समितीचे अध्यक्ष मा. अधिविभाग प्रमुख, इतिहास अधिविभाग हे असतील.
6. व्याख्यानमाला व चर्चासत्रासाठी देणगीदारांना निमंत्रित म्हणून बोलवावे.
7. पुस्तक प्रकाशन अनुदान कोणास दिले याची माहीती देणगीदारांना पत्राव्दारे कळविण्यांत यावी.